|| अल्पारंभ: क्षेमकर:||

|| अल्पारंभ: क्षेमकर: ||
SWS Financial Solutions Pvt. Ltd.
Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle,
Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013

अंक : १५ वा जून २०१८

# गवाक्ष

......एक विचारमंच ! आर्थिक साक्षरतेसाठी

## संपादकीय...



नमस्कार !!

सिंगले विंडो सर्विसेस, आर्थिक सल्ला व गुंतवणूक क्षेत्रात, गेली २१ वर्षे कार्यरत आहे.

ह्या क्षेत्रात कार्यरत असताना, गुंतवणूकदारां संबधित आलेल्या अनुभवांचा खजिना अमुल्य आहे. ह्या अनुभव संपत्तीद्वारे आम्ही आमची कार्यपद्धती अधिकाधिक सुधारीत करीत आलो आहोत. या अनुभवांनी हे कायमच स्पष्टपणे उधृत केले आहे की गुंतवणूकदारांनी, आपल्या आर्थिक व्यवहाराशी निगडीत असणाऱ्या सर्वच कागदपत्रांची अत्यावश्यक ती काळजी घेतलीच पाहिजे. ह्यात कागदपत्रे व्यवस्थीत फाईल करणेपासून ते परिस्थितीअनुरूप कागदपत्रात वेळोवेळी आवश्यक ते बदल करून घेणे पर्यंत सर्वच आले. पण बरेचदा ही खबरदारी न घेतली गेल्याने, मानसिक, शारीरिक आणि आर्थिक मनस्ताप झाल्याचे अनेक अनुभव आठवणीत आहेत. गवाक्षच्या ह्या आणि पुढील काही अंकांद्वारे असेच काही अनुभव वाचकांसमोर ठेवीत आहोत. त्याद्वारे, आपणही आपली कागदपत्रे पुनश्च एकदा पडताळून पाहाल आणि आवश्यक ती पावले त्वरीत उचलाल अशी खात्री वाटते. सोबत आर्थिक साक्षरते संबधित इतर काही लेख आहेतच.

**श्री. रघुवीर अधिकारी,**
सी.ई.ओ.,
SWSFSPL

## New Step Towards Progress...



Dear all, I am happy to share with you that, we have taken a new step towards further progress. We have moved to a newer, larger and technologically advent premise at Jehan Circle, Gangapur road. We as team SWSFSPL, have always strived for holistic growth of all of us as a family and will be happy to serve you from here, with the same on-the-toes efficiency as previous.

It also gives me pleasure to add that we are relaunching our bulletin namely “Gawaksh” which is dedicated to our mission of “Financial Literacy” of all. It also spreads more awareness about the latest updates in the market, new financial avenues and schemes and allows us to be in touch with you. We also assert that, we being the all-time students should train ourselves or improve our capabilities in the areas of our interests. Hence at this new premise, we have developed, a very soothing training environment which we name as Muktangan. With Muktangan, we are also restarting many activities for you like Saturday Club, Movie Club, Financial Literacy Club and many such activities which will enable us to explore the wonderful world of art, music and so on.

So, do visit us here again! We are excited to welcome you. .

**-Deepak Kulkarni,**
Managing Director,
SWSFSPL

# स्थावर मालमत्तेचे नियोजन



विशेष नोंद : ह्या लेखातील सर्व अनुभव हे सत्यघटनेवर आधरित असून काल्पनिक नावे घेऊन सादर केलेले आहेत.

एक आर्थिक सल्लागार म्हणून मला असे वाटते की आपण प्रत्येकानेच आपले कुटुंबावरील प्रेम ह्या संकल्पनेचा सर्वच दृष्टीकोनातून विचार करावयास हवा. आपला सहवास, अन्न, वस्त्र, निवारा आपल्या कुटुंबियांना देणे आणि या भौतिक गरजा पूर्ण करणे म्हणजे कुटुंबावरील प्रेम व्यक्त करणे असते का ? वरकरणी जरी याचे उत्तर हो असे दिसत असले तरी हे परिपूर्ण उत्तर नव्हे. अन्न, वस्त्र, निवारा ह्या मुलभूत गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी घेणाऱ्या प्रेमाला आपण प्रेमच म्हणुयात. परन्तु ह्या मुलभूत गरजांप्रमाणेच सर्वकालीन आर्थिक सुरक्षा ही देखील मूलभूत गरजच नव्हे का ? कुटुंबप्रमुखाच्या उपस्थितींत जसे कुटुंबातील सदस्याना सुरक्षित वाटते तसेच त्याच्या / तिच्या अनुपस्थित देखील वाटले पाहिजे. अशी काळजी जे कुटुंब प्रमुख आपल्या कुटुंबाच्या बाबतीत घेतात ते आणि केवळ तेच कुटुंबावर सर्वार्थाने सजग प्रेम करतात असे म्हटल्यास वावगे ठरू नये. ह्या सजग प्रेम संकल्पनेचा बोध होण्यासाठी माझा पुढील मांडलेला अनुभव आपल्याला मदत करू शकेल.

या अनुभवात आहे जाई !! मुंबईकर दाम्पत्याच्या जीवनात जाईच्या जन्मानंतर आनंदाची बहार आली. परंतु जाई काही महिन्यांची असतानांच तिच्या पालकांचा अपघातात दुर्दैवी अंत झाला. तेव्हा लहानग्या जाईची जबाबदारी तिच्या वयस्कर असणाऱ्या कुसूम आत्यांनी घेतली. परन्तु दुर्दैवाचे चक्र अजुनही थांबले नव्हते. जाई वर्षाची होण्याच्या आतच, तिच्या एकंदरीत प्रगतीवारून ती एक गतिमंद बालिका असल्याचे आत्यांच्या लक्षात आले. तरीही, जाईच्या पालकांच्या रोख राहिलेल्या मिळकती मधून त्या जाईचा मायेने सांभाळ करीत राहिल्या. जाई ८ वर्षांची होईपर्यंत हे सर्व व्यवस्थीत चालू राहिले. आत्यांच्या आर्थिक अडचणी आणि वयोमानानुसार आलेली आजारपणे ह्यामुळे, जाईला नासिक येथे गतिमंद मुलींच्या वसतीगृहात पाठविण्यात आले. आत्याधुनिक सुविधा, मायेने सांभाळ करणाऱ्या ताई आणि समवयस्क मैत्रिणी ह्यात जाई रमली. परन्तु लवकरच वततीगृहाचा मासिक खर्च आत्याना पेलवेनासा झाला. जाईच्या पालकांचे राहते घर असलेली सदनीका, पुनर्विकासासाठी पाडण्यात आलेली आहे. जाई अजुनही सज्ञान नसल्या कारणामुळे, ही जागा तिच्या वडीलांच्याच नावे आहे. जागेचा पुनर्विकास करणारा बिल्डर हा भला माणुस असल्याकारणाने, तो आज वसतीगृहाचा मासिक खर्च देतो आहे.

ही सर्व कथा समजून घेतल्यानंतर, एक आर्थिक सल्लागार म्हणून माझ्यापुढे साहजिकच पुढील प्रश्न उभे राहिले.

१) जागेचा पुनर्विकास करणारा बिल्डर हा किती काळ वसतीगृहाचा मासिक खर्च देणार आहे? उद्या त्याची बुद्धी फिरली तर जाईच्या वारसा हक्काची जागा तिला मिळेल काय?

२) आत्यांचे काही बरे वाईट झाल्यास, जाईच्या वारसाहक्काची जागा तिला कोण मिळवून देणार? तसेच त्या जागेचे विकसित मूल्य कोण ठरविणार जेणेकरुन जाईचा आजीवन खर्च वसतीगृह उचलू शकेल ?

३) वारस म्हणून जाईच्या नावाने मालमत्तेचे नियोजन करणे हे तिच्या पालकांचे कर्तव्य नव्हते का?

ह्या आणि अशा बऱ्याच अनुभवांवरुन असे लक्षात येते की,

कुटुंबात नवीन 'सदस्य' आल्यावर किंवा कुटुंबातील कोणी सदस्य जाण्यापूर्वी त्या व्यक्तीशी निगडीत (संदर्भातील) विविध स्थावर आणि इतर आर्थिक मालमत्तेचे कागदोपत्री पुनरावलोकन करुन लगोलग आवश्यक असे बदल करणे निकडीचे असते. ही शब्दशः तातडीने करावयाची बाब आहे.

जर पालकांनी वेळीच त्यांच्या जागेच्या' बाबतीत योग्य अशी पावले उचलली असती तर आज वयस्कर कुसूम आत्यांवर, त्यांची स्वतःची आर्थिक अडचण आणि आरोग्याची हेळसांड चालू असताना, जाईसाठी न्यायालयाच्या पायऱ्या चढण्याची वेळ आली नसती. जाईच्या कथेवरुन हेच सुस्पष्ट होते की जर जाईच्या पालकांनी, तिच्या बाबतीत सजग प्रेम दाखविले असते तर तिच्या भविष्याची नामुष्की ओढविली नसती.

या कथेचा सारांश असा की आपण बहुतांशजण आपल्या स्वतःच्या आयुष्याबद्दल अगदी भ्रामक कल्पना घेऊन जगत असतो. उदारणार्थ: मी पूर्णपणे सुदृढ आहे, इतक्यात मला काही होत नाही, मी हुशारीने माझ्या कुटुंबासाठी अगदी सगळी सोय करुन ठेवलेली आहे, वगैरे वगैरे. परंतु क्षणभंगूर आयुष्याला गृहीत धरणे म्हणजे स्वतःची आणि कुटुंबाची फसगत करणे ठरु शकते आणि आपल्या मालमत्तेच्या कागदपत्रांच्या बाबतीत अगदी लहानशा ठिकाणी झालेले दुर्लक्ष आपल्याच प्रियजनांना पुढे त्रासदायक ठरु शकते.

वरील सर्व विवेचनावरून तुम्हीच ठरवा की तुम्ही तुमच्या कुटुंबावर केवळ प्रेम करती की सजग प्रेम करता? जर तुम्ही सजग प्रेम करीत असलात किंवा तुम्हाला तसे सजग राहण्याची इच्छा असेल तर तुम्ही तुमच्या कुटुंबियांशी निगडीत सर्वच आर्थिक व्यवहारांशी संबंधीत कागदपत्रे पुन्हा एकदा आर्थिक सल्लागारामार्फत पडताळून घेतली पाहिजेत आणि आवश्यक ते महत्त्वपूर्ण असे बदल तात्काळ करून घेतले पाहिजेत. आर्थिक साक्षर असणारी व्यक्ती वरील अनुभवावरून नक्कीच धडा घेईल.

**श्री. रघुवीर अधिकारी,**
सी.ई.ओ., SWSFSPL
**अनुभव शब्दांकन : सौ. रुपाली कुलकर्णी**

# One Page Financial Plan

(Ref: A book "One Page Financial Plan" by Carl Richards)



The common man is worried about how to achieve the life goals. As the inflation is increasing day by day and income level is not increasing accordingly, financial worries result. Money is the most essential element in achieving any desired life goal and for achieving them, appropriate financial planning is mandatory.The common man keeps low interests in the financial instruments and avenues, hence the role of Financial Advisor is significant

The financial plan is basically the plan to fulfil the desires and aspirations of an individual but, at the same time it is also about their duties and responsibilities for which the investor is liable. The properly drafted financial plan helps any individual to achieve his/herdreams and accomplish there lated duties.

While preparing the financial plan, the planner or advisor first needs to know the financial priorities of the investor. On that basis the investor clearly communicates the current financial status and the future financial goals to the financial planner for efficient financial planning. The financial goals may include marriage, children's education, children's marriage, dream car, owned house, travelling around the world, etc. For achieving these goals, at the adequate stages of life, financial plan helps.

The common man is generally unware of the details of each investment avenues and their schemes, in this case it is investment advisor's responsibility to make a simple plan which can clearly communicate the future situation of the investor's funds. The investment advisor should frame a timeline and allocate the goals on it according to the risk appetite of the investor. The plan should give the clear idea about how much money will be available after how much time period.

The one-page financial plan represents the financial goals of the investor, the available funds, risk appetite and the allocation of the funds.The one-page financial plan also depicts the returns on the investments. It also gives the answer to the following questions.

1. Are investments giving the desired returns?
2. Are the investments are made according to the financial goals and timeline?
3. Are provisions made for contingencies?

Basically, the client and the advisor should have the clarity about the goals and should be on the agreement.The desires and aspirations of the investor should be time bound and realistic. They should be expressed in terms of money. If the goals are clear, then the financial plan can be easy and implementable.The advisor should know the priorities of the client and allocate the money into different asset classes. The one-page financial plan is important because it will be easy to understand and implement. The client and advisor should create the strong relationship and mutual trust to execute the plan. The client should have faith in his advisor and advisor should also maintain his trustworthiness and integrity.

**Soham Gadre,**
Management Trainee,
SWSFSPL

# Need of Rational Financial Behavior



Let me tell you the story of two investors, who were good friends. However, their paths crossed in an interesting way.

Mr. Narayan had his own business and was very much greedy about the money. He had no technical knowledge about the share market however this financial instrument always attracted his attention. Once he remembered his friend Mr. Sanjay who had earned double money in less time horizon. So, Mr. Narayan decided to invest in share market on the basis of Mr. Sanjay's experience. But unaware about the risks of share market, Mr. Narayan lost Rs.1,00,000.

**Why this happens?**

People take decisions based on past experiences of self or others. However, past experience does not always guarantee the performance in future. A customer-service representative hinges on whether gains on money will be positive or negative. If friend describes positive experience about a particular investment then we makeup our mind positively and vise a versa. Also, there exists herd-mentality which leads investors to follow the investment choices that others make.

I want to assert that people think based on their experiences and take irrational decisions, draw wrong conclusions. Investment decisions are very important in every one's life and asset allocation needs to be done only as per the risk bearing capacity.

There are so many experiences, facts which assert that financial behavior is not possessed and exhibited even by really smart people. Behavior is inborn, hard to be guessed however as it changes over time, can't we learn financial behavior?

Don't take irrational decision referring to experiences of others. Failure in money management is very much harmful for mind and health concerns of not only the investor but also to the lives of the dependents. Good investor never works for money but he invests his money in such way that money will work for him. Be financially literate! Adopt financially rational behavior!!

**Kalyani Kotawar,**
Management Trainee,
SWSFSPL

# पॅन कार्डचे महत्त्व



पॅन कार्ड म्हणजे पर्मनन्ट अकाऊंट नंबर. पॅन क्रमांक म्हणजे भारतीय नागरिकाची ओळख आहे. या दहा आकडी क्रमांकामध्ये अक्षरे व अंकांची जुळवणूक असते. भारतीय आयकर कायदा, १९६१ अंतर्गत पॅन क्रमांक सर्व भारतीयांना दिला जातो. पॅन कार्ड आयकर विभाग देते. यासाठी केंद्रीय करमंडळांतर्गत तरतूद आहे. भारतीयांप्रमाणे पॅनकार्ड परदेशी नागरिकांनाही दिले जाते, पण त्यासाठी वैध व्हिसा व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. बहूतांशी आर्थिक व्यवहार करतांना पॅनकार्ड असणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यक्तिचे पॅनकार्ड ही केवळ त्या व्यक्तिची ओळख असते.

पॅनकार्डचा उपयोग हा विविध ठिकाणी केला जातो. आयकर विवरण (रिटर्न) भरताना, टिडीएस दाखवताना टिडीएसचा परतावा मागताना, आयकर विभागाबरोबर कोणताही पत्रव्यवहार करतांना तसेच कोणतीही आर्थिक गुंतवणूक करताना पॅनकार्ड गरजेचे आहे. बँक खाते उघडायचे झाल्यास, टेलिफोनची नवी जोडणी हवी असल्यास परकिय चलन खरेदी करताना, पन्नास हजारांपेक्षा जास्त रक्कम बँकेत ठेवताना वा काढताना, नवे वाहन खरेदी करताना इत्यादी प्रत्येक व्यवहारासाठी पॅनकार्ड असणे गरजेचे आहे.

आता तुम्हाला पॅनकार्ड नसल्यामुळे झालेल्या मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रासाबाबत अनुभव सांगतो. नाशिक शहरात ७० ते ८० च्या दशकात एक प्रसिद्ध वकील होवून गेले. त्यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी व दोन मुले असा परिवार होता. त्यांची व त्यांच्या पत्नी (प्रसिद्ध महाविद्यालयातील अध्यापिका) दोघांची बँकेत ''फिक्सड् डिपॉझीट'' खात्यात गुंतवणूक होती. दोघे जण आर्थिकदृष्ट्या साक्षर असल्यामुळे त्यांनी आपल्या गुंतवणूकीला वारस नमूद केला होता. त्यांच्या पत्नीने दुसऱ्या मुलाला वारस नमूद केले होते. परंतु मुलगा उच्च शिक्षणाच्या उद्देशाने परदेशी गेला आणि तो तिथेच स्थायिक झाला. आई वडिलांशी मुलाने संबंध जोपासले, परंतु त्याचा भारतातील व्यवहारांशी काही संबंध नव्हता. कालांतराने ह्या दाम्पत्याचे निधन झाले. परंतु त्यांनी केलेली गुंतवणूक ही तशीच होती. त्यांच्या जाण्यानंतर त्या गुंतवणूकीबद्दल वारस या नात्याने बँक कर्मचाऱ्यांनी त्यांच्याशी संपर्क साधला व गुंतविलेल्या रक्कमेवर हक्क प्रस्थापित करण्यासाठी (दुसऱ्या मुलाला) त्याबद्दल कळवले. त्यासाठी आवश्यक असलेल्या कार्यवाहीची विचारणा केली असता बँक कर्मचाऱ्यांनी त्यांना सर्वप्रथम 'पॅन कार्ड' बद्दल विचारले. मुलाने पॅनकार्ड नाही म्हणून कळवले. (कारण शिक्षणासाठी परदेशी गेल्यानंतर त्याने भारतात आर्थिक व्यवहार चालू ठेवलेच नाही) त्यामुळे ह्या गुंतवणूकीवरचा वारसाहक्क मिळवण्यासाठी बँकेसमोर विविध पुरावे व कागदपत्रे सादर केली परंतु बँकेने पॅनकार्डचीच मागणी केली. याबाबत सिंगल विंडो सर्व्हिसेसकडे विचारणा केली असता आम्ही त्यांना त्वरित होकार देत त्यांना पॅनकार्ड कसे मिळवून देता येईल या गोष्टीचा तपास सुरू केला व अनिवासी भारतीयांसाठी पॅनकार्ड कसे उपलब्ध करता येईल याबद्दल माहिती मिळवली व आवश्यक तो अर्ज व त्यासोबत लागणाऱ्या कागदपत्रांची यादी त्यांना ई-मेल द्वारे पाठवली. त्यांनी त्या कागदपत्रांची पूर्तता करून अर्जावर स्वाक्षरी करून ते कागदपत्र पोस्टाने आम्हाला पाठविले. आम्ही अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडली व पॅनकार्ड मिळणेबाबत तयारी पूर्ण केली. त्या अर्जातील सर्व मजकूर हा आयकर विभागाकडे गेल्यानंतर पुढील २१ दिवसात ''पॅनकार्ड'' हे त्यांच्या भारतीय पत्त्यावर आले. अशा रितीने पॅनकार्ड प्राप्त झाल्यानंतर त्यांना पालकांच्या सर्व गुंतवणूकीवर वारसाहक्क मिळविता आला.

आजच्या टेक्नॉलाजीच्या जगात ह्या गोष्टी कमी वेळात व सहजगत्या उपलब्ध झाल्या नाहीतर एका पॅनकार्डच्या नसण्यामुळे त्यांच्या गुंतवणुकीचा त्यांनाच फायदा झाला नसता. आर्थिकदृष्ट्या साक्षर असणाऱ्या प्रत्येक व्यक्तिने आपले पॅनकार्ड हे लवकरात लवकर काढणे गरजेचे आहे. ह्या एका कागदपत्रामुळे वेळतर वाचतोच, शिवाय मानसिक त्रासातुनही सुटका होतेच. नाही का!!

**ऋषभ भरत सोनवणे**
गुंतवणूक विभाग
SWSFSPL

।। अल्पारंभ: क्षेमकर: ।।

SWS Financial Solutions Pvt. Ltd.

Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle, Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013

**SWS Mumbai Branch**
07, Zee Usha Swapna, Mahant Road Junction,
Hanuman Cross Road, No.1,
Vile Parle (East) Mumbai 400057
**Kishor Kale : 9869239940/ 9224433122**

**SWS Nagpur Branch**
Plot No. 30, Mandar Apartment,
Inline of Anandpurti Super Bazar,
Khamla-Jaitala Road, Nagpur - 440025.
**Neeraj Adbe : 8308833724**

**SWS Pune Branch**
Office No.1, Anand Corner,Anand Park,
Wadgaonsheri, Pune - 411 014.
**Swapnil Ekande : 9828735055 / 7720099241**

**SWS Wardha Branch**
C/o.S.Sardar, Seneguruji Nagar,
Bachelor Road, Wardha - 442001.
**Girish N. Wankhede : 9970835446**